जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन आदेश, क्रमांकः एसएलएस १११९/प्र.क्र. ४२६/२०१९/आ (वर्ग-१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
**दिनांक : २३ सप्टेंबर, २०२१.**

शासन आदेश :-

जलसंपदा विभागातील उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना सन २०१९-२० च्या निवडसूचीमधून कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर, एस-२३ (रुपये ६७७००-२०८७००) या सुधारित वेतनश्रेणीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून **तदर्थ/ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती** देण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| १. | श्री.सुरेश दिगंबर सायरे (ज्ये.क्र. १६, खुला) |
| २. | श्री.विलास रामचंद्र प्रधान (ज्ये.क्र. १७, खुला) |

२. वरील अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे:-

१) सदर पदोन्नती, मा. उच्च न्यायालय, मुंबई मधील रिट याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२) सदर पदोन्नती, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र. १०८७६/२०२१ व रिट याचिका (स्टॅम्प) क्र. १०८७८/२०२१, तसेच इतर याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम आदेशाच्या अधीन राहील.

३) सदर पदोन्नती, पदोन्नतीमधील दिव्यांग आरक्षणाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दाखल केलेल्या रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ६८१९/२०२१ व इतर रिट याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

४) वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांस सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून ज्येष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

५) सदर पदोन्नती कोणतीही पर्वूसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचे अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

३. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने या विभागातील रिक्त पदांवर पुढे दर्शविल्यानुसार पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्या धारण करीत असलेले पद | पदोन्नतीने पदस्थापनेचे पद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री.सुरेश दिगंबर सायरे | उप अभियंता, यांत्रिकी अभियांत्रिकी कर्मशाळा, उपविभाग क्र. १, नागपूर. | सहायक मुख्य अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर या रिक्त पदी. |
| २. | श्री.विलास रामचंद्र प्रधान | उप अभियंता, यांत्रिकी उपविभाग क्र. ३, वाही, पवनी. | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, बीड या रिक्त पदी. |

४. सदर अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०२१ नुसार महसूली विभागाचे वाटप करण्यात आलेले आहे.

५. सदर पदोन्नत अधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे/ नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहीत धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र.११/८९/बारा, दि.३०.०४.१९९१ मधील तरतूदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

६. पदोन्नत अधिकाऱ्यांनी पदग्रहण केल्यापासून १ महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक ११(१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

७. संबंधित नियंत्रक अधिका-यास कळविण्यात येते की, पदोन्नत उप अभियंता यांना पदोन्नतीने नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करावे. त्याचप्रमाणे, पदोन्नत अभियंत्यांना पदोन्नतीने नियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

८. सदर शासन आदेश जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, संबंधितांनी डाऊनलोड करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र. वि. कुलकर्णी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.

३) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव (लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
७) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
८) मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग.
९) सर्व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग.
१०) खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
११) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.
१३) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१४) संबंधीत अधिकारी.
१५) सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ./ कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.